| लातूर | वर्ष ३५ वे | अंक १०७ वा | गुरूवार, दिनांक १६ जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## मुलांच्या कॅन्सर हॉस्पिटलवर अमेरिकेचा क्षेपणास्त्र हल्ला



**नवी दिल्ली / वृत्तसंस्था :** इराण युद्ध आता अत्यंत भीषण वळणावर जाताना दिसत आहे. रात्रभरात इराणवर ५०० मिसाइल डागल्यानंत आता अमेरिकेने थेट इराणमधील मुलांच्या एका कॅन्सर हॉस्पिटलला लक्ष्य केले. अहवाझ शहरातील 'शाहिद बगैई' रुग्णालयावर अमेरिकेने क्षेपणास्त्र हल्ला केला. यानंतर, येथे केमोथेरपी घेत असलेल्या मुलांना तातडीने बाहेर काढावे लागले. हा अमेरिकेचा गेल्या २४ तासांतील ३ हल्ला होता. तत्पूर्वी, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशानंतर अमेरिकेने पहिल्यांदाच इराणची राजधानी तेहरानच्या जवळपासच्या परिसरातील चाबहार, बंदर अब्बास आणि खुर्रमआबाद सारख्या अनेक शहरांवर क्षेपणास्त्रे डागली. या हल्ल्यांमध्ये आतापर्यंत ३५ हून अधिक जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. तर ३०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. भडकलेल्या इराण अमेरिकेचे महाशक्तिशाली ड्रोन पाडले

या हल्ल्याने भडकलेल्या इराणनेही अमेरिकेला चोख प्रत्युत्तर दिले आहे. इराणने आपल्या नव्या हवाई संरक्षण प्रणालीच्या सहाय्याने अमेरिकेचे अत्यंत महागडे आणि शक्तिशाली 'MQ-9 रीपर ड्रोन' हवेतच उडवून दिल्याचा दावा केला आहे. एवढेच नाही, तर इराणने बहरीनमधील अमेरिकेच्या नौदल तळांलाही लक्ष्य केले. तसेच, जोवर अमेरिका हल्ले बंद करत नाही, तोवर होर्मुझ बंदच ठेवले जाईल, असेही इराणने म्हटले आहे.

### ट्रम्प यांची इराणला पुन्हा नवी धमकी -



**दरम्यान, अमेरिकेच्या २४ तासांतील तिसऱ्या हल्ल्यानंतर, ट्रम्प यांनी इराणला पुन्हा नवी धमकी दिली आहे. आमचे हल्ले त्यांना सहन होत नाहीयेत आणि त्यांना तडजोड हवी आहे. तडजोड होते की आम्ही त्यांना पूर्णपणे नष्ट करतो, बघुया, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. एवढेच नाही तर, इराण चर्चेला तयार झाला नाही, तर पुढील आठवड्यात त्यांचे पॉवर प्लांट आणि पूल उडवून देऊ, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे.**

## दोन रस्ता अपघातांमध्ये दोन युवकांचा मृत्यू

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील लातूर ग्रामीण व चाकूर पोलीस ठाणे हद्दीत घडलेल्या दोन स्वतंत्र रस्ता अपघातांमध्ये दोन युवकांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, दोन्ही प्रकरणी संबंधित वाहनचालकांविरुद्ध भारतीय न्याय संहिता व मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या दोन्ही घटनांचा पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्यांकडून सुरू आहे.

**लातूर ग्रामीण पोलीस ठाणे – वेगाचा अंदाज चुकल्याने दुर्दैवी अपघात**

लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १७३/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम २८१, १०६(१), १२५ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी महादेव नरसिंग तोतके (वय ४५, रा. समता नगर, शिरूर अनंतपाळ) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचा मुलगा स्वराज महादेव तोतके (वय १८ वर्षे) हा २४ मे २०२६ रोजी रात्री सुमारे १०.४० वाजता बजाज पल्सर (क्र. MH-24-CB-1385) मोटारसायकलवरून लातूरहून बाभळगाव मार्गे शिरूर अनंतपाळकडे जात असताना, बाभळगाव बसस्थानकाजवळील रस्त्यावर असलेल्या गतीरोधकाचा अंदाज न आल्याने मोटारसायकल गतीरोधकावर आदळली. त्यानंतर वाहनावरील ताबा सुटून तो रस्त्यावर पडला व गंभीर जखमी झाला. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

**चाकूर पोलीस ठाणे – रॉंग साईडने भरधाव दुचाकी चालवल्याने जीवघेणा अपघात**

चाकूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३९४/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम २८१, १०६(१), १२५(अ) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी गोभा संजय सोमवंशी (वय ५०, रा. भवानी गल्ली, चाकूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ४ जुलै २०२६ रोजी पहाटे सुमारे ५.४५ वाजता अहमदपूर बायपास हायवेवर आलगरवाडी मार्गावर आरोपी मनोज त्र्यंबक झांबरे (रा. चाकूर) याने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल (क्र. MH-24-AH-6531) रॉंग साईडने, भरधाव व निष्काळजीपणे चालविल्याने वाहन घसरून अपघात झाला. या अपघातात आरोपी स्वतः जखमी झाला, तर फिर्यादीच्या पतीस गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला.

प्राथमिक तपासात मयताने वाहन चालविताना हेल्मेटचा वापर केला नसल्याचे समोर आले आहे. अपघातात रस्त्यावर पडल्याने त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. हेल्मेटचा वापर केला असता गंभीर दुखापत टाळण्याची शक्यता होती.

**वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन**

लातूर पोलीस नागरिकांना पुन्हा एकदा आवाहन करीत आहेत की, अतिवेग, निष्काळजी वाहनचालक, रॉंग साईडने वाहन चालविणे तसेच वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करणे हे जीवघेणे ठरू शकते. वाहन चालविताना वेगमर्यादेचे पालन करावे, हेल्मेटचा वापर करावा आणि रस्त्यावरील गतीरोधक व इतर सूचना फलकांकडे विशेष लक्ष द्यावे. सुरक्षित वाहनचालकच सुरक्षित जीवनाची हमी देऊ शकतो.

## बीज भांडवल योजनेचा तृतीयपंथीयांनी लाभ घ्यावा-जिल्हाधिकारी




**लातूर/प्रतिनिधी :** तृतीयपंथीयांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत बीज भांडवल योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत स्वयंरोजगारासाठी तृतीयपंथीयांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तृतीयपंथीयांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देणे, कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षणाद्वारे शाश्वत रोजगार निर्माण करणे तसेच त्यांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास साधणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असून, लघुउद्योग व सूक्ष्म व्यवसाय सुरू करण्यासाठी हे बीज भांडवल दिले जाणार आहे. लातूर जिल्ह्यातील तृतीयपंथीयांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले.

तृतीयपंथीयांना स्वयंरोजगार व व्यवसायासाठी बीज भांडवल योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड, जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राहुल आठवले यांच्यासह तृतीयपंथीयांच्या संघटनांचे प्रतिनिधी, संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

बीज भांडवल योजनेअंतर्गत भाजी स्टॉल, वडा-पाव किंवा ज्यूस सेंटर, चहा व स्नॅक्स सेंटर, बेकरी, झेरॉक्स व लॅमिनेशन सेंटर, बांगडी दुकान, पिठाची गिरणी, ब्युटी पार्लर, सलून, जनरल स्टोअर्स, स्टेशनरी, मोबाईल शॉपी, मिनी मालवाहतूक टेम्पो, मसाला निर्मिती, लॉन्ड्री तसेच प्लंबर, इलेक्ट्रिशियन आणि विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या दुरुस्ती व्यवसायांसह अनेक स्वयंरोजगार उपक्रमांसाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. यामध्ये २५ हजार रुपये लघु कर्ज, ५० हजार रुपये मध्यम कर्ज आणि २ लाख रुपये दीर्घ कर्ज अशा तीन प्रकारांत कर्ज दिले जाते. या कर्ज रक्कमेमध्ये लाभार्थ्याचा ५ टक्के, शासनाचा ४५ टक्के आणि राष्ट्रीयकृत बँकेचा ५० टक्के आर्थिक सहभाग आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याजावर ३ टक्के सवलतही दिली जाणार आहे. तसेच, या योजनेसाठी कोणत्याही जामीनदार किंवा तारणाची आवश्यकता भासणार नाही, असे जिल्हाधिकारी म्हणाले.

इच्छुक अर्जदारांनी अर्जासोबत अधिवास प्रमाणपत्र, तृतीयपंथीय ओळखपत्र, आधार कार्ड किंवा अन्य ओळखपत्र, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, यंत्रसामग्रीचे कोटेशन, आवश्यकतेनुसार भाडेकरार, ना-हरकत प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो जोडणे आवश्यक आहे. तृतीयपंथीयांनी स्वावलंबी होण्यासाठी या योजनेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालय येथे संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले.

तृतीयपंथीयांसाठी आधार नोंदणी, विविध दाखले वाटप आदी बाबींचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

## महाराष्ट्रच्या शिवनेरी सृजन वार्षिक विशेषांकाचे प्रकाशन



**निलंगा/अयुब बागवान :** महाविद्यालयीन शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान आत्मसात करणे नव्हे तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणांचा विकास करणे होय.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, लेखनाला वाव मिळावा आणि ते मुक्तपणे लिहिते व्हावेत यासाठी शिवनेरी सृजन हा विशेषांक दरवर्षीप्रमाणे प्रकाशित करण्याचा मानस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम यांनी व्यक्त केला होता.त्यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा विशेषांक पुर्णत्वास आला. या शिवनेरी सृजन विशेषांकाचे प्रकाशन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष मा. विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. ते म्हणाले की,विशेषांक म्हणजे केवळ शब्दांचा संग्रह नसून तो विद्यार्थ्यांच्या मौलिक विचार, भावना यांच्या सुंदर अभिव्यक्तीचे माध्यम व्हावे आणि ही प्रक्रिया सातत्यपूर्ण चालू राहावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ह्या विशेषांकास परीपुर्णआकार देणाऱ्या संपादक मंडळाचे कौतुकही त्यांनी केले.हा अंक अगदी दर्जेदार व उत्तम झाल्याची प्रशंसा त्यांनी केली. या प्रकाशन कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गोविंद शिवशेट्टे यांनी केले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कर्मवीर कदम, उप प्राचार्य व संपादक मंडळ सदस्य डॉ. भास्कर गायकवाड , कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.पी.पी. गायकवाड, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते या विशेषांकासाठी संपादक डॉ गोविंद शिवशेट्टे व सदस्य डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, प्रा. रेश्मा चौधरी, प्रा. धनराज किवडे,प्रा. दुर्गेश्वरी चौथवे , श्री नामदेव गाडीवान,श्री अतिक शेख,श्री लहु उसनाळे,श्री सचिन चांभारगे व सिध्देश्वर कुंभार,श्री सुनिल वाकळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## आ. निलंगेकर यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्यवर्धिनी समितीची बैठक संपन्न

**निलंगा/अयुब बागवान :** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णयानुसार स्थापन करण्यात आलेल्या एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची निलंगा विधानसभा क्षेत्रातील पहिली बैठक सोमवारी पार पडली. निलंगा तहसील कार्यालयात माजी मंत्री तथा आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य सेवांच्या बळकटीकरणावर सविस्तर चर्चा झाली.




यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या जिल्हा परिषद अध्यक्षा उषा संभाजीराव पाटील तळेगावकर यांच्या हस्ते तालुक्यातील क्षय रुग्णांना पोषण आहार किटचे वितरण करण्यात आले. बैठकीत निलंगा, देवणी व शिरूर अनंतपाळ तालुक्यातील आरोग्य सेवांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया यांसारख्या साथीच्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आरोग्य केंद्रांनी सतर्क राहावे आणि औषधांचा मुबलक साठा ठेवावा, अशा कडक सूचना आमदार निलंगेकर यांनी दिल्या.

तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरणे, प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेची प्रभावी अंमलबजावणी, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांची दुरुस्ती आणि पाणी-वीजपुरवठ्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले. प्रलंबित प्रश्न शासन स्तरावर सोडविण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. बैठकीस तहसीलदार, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, पंचायत समितीचे पदाधिकारी आणि विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पावसाळी आजारांबाबत सतर्कतेचा इशारा.....**

पावसाळ्यामुळे डेंग्यू, मलेरिया आणि अतिसारासारख्या आजारांचा धोका वाढतो. या पार्श्वभूमीवर आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सर्व आरोग्य केंद्रांना सतर्कतेचे निर्देश दिले आहेत. रुग्णालयांत औषधांचा पुरेसा साठा असावा आणि आपत्कालीन स्थितीत नागरिकांना तत्काळ वैद्यकीय सेवा मिळावी, यासाठी प्रशासकीय समन्वयाची गरज त्यांनी अधोरेखित केली.

**रुग्णांना पोषण आहाराचे वाटप...**

आरोग्यवर्धिनी समितीच्या या महत्त्वपूर्ण बैठकीत केवळ प्रशासकीय चर्चाच झाली नाही, तर प्रत्यक्ष रुग्णांना दिलासा देणारा उपक्रमही राबवण्यात आला. जिल्हा परिषद अध्यक्षा उषा पाटील तळेगावकर यांच्या हस्ते क्षय रुग्णांना पोषण आहार किटचे वितरण करण्यात आले. यामुळे रुग्णांना वैद्यकीय उपचारांसोबतच योग्य आहाराची जोड मिळण्यास मदत होणार आहे.

**तीन तालुक्यांचा आढावा....**

विधानसभा क्षेत्रनिहाय स्थापन झालेल्या या पहिल्याच बैठकीत निलंगा, देवणी आणि शिरूर अनंतपाळ या तीनही तालुक्यांतील आरोग्य व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. उपजिल्हा रुग्णालय आणि ग्रामीण रुग्णालयांच्या वैद्यकीय अधीक्षकांनी सध्या उपलब्ध असलेल्या सुविधा, प्रलंबित कामे आणि आवश्यक उपाययोजनांची माहिती बैठकीत सविस्तरपणे मांडली. चायत समितीच्या सभापती अंकिताताई पाटील, शिरूर अनंतपाळ पंचायत समितीचे सभापती संजय सूर्यवंशी, विविध विभागांचे अधिकारी, नगराध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती पदाधिकारी तसेच समितीचे अशासकीय सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आरोग्य विभागातील रिक्त पदांवर भर.....**

आरोग्य सेवा सुरळीत चालण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरणे अत्यंत आवश्यक आहे. बैठकीत या मुद्द्यावर विशेष चर्चा झाली. याशिवाय, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांच्या इमारतींची दुरुस्ती, नवीन बांधकाम, तसेच वीज आणि पाण्याचा नियमित पुरवठा सुनिश्चित करण्याबाबत संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## आत्महत्या




मनासारखं होत नसेल
मनासारखं नसेल घडत
झालं गेलं सारं विसरून
नव्याने पुन्हा जगता येत

कोणीतरी आपलं असत
त्यांच्यासाठी जगता येत
कोणीच आपल्या नसेल
एकटयालाही जगता येत

जुनी नाते सोडता येतात
नवीन नाती जोडता येतात
जुने मित्र सोडता येतात
नवीन मित्र जोडता येतात

पशु पक्षांनी आत्महत्या केली
असे कधी कुठे घडलय का?
सुशिक्षित ज्ञानी माणसाने
जग सोडून जायचं असतं का?

नाते संसार हा व्यवहार आहे
एकत्र जगण्यासाठीची तडजोड
जेव्हा असाह्य पर्याय नसतो
मन मोह मुक्त कर, सार सोड

तू ही पाहिलास, पाहत होतास
जग, मित्र, कुटुंब मस्त जगतात
कोणालायच कोणाची उणीव
जगात कोणालाच नसते भासत

विश्व खूप मोठे, अथांग आहे
हो पाखरू,घे उंच उंच भरारी
स्वतःला संपवणे पुरुषार्थ नाही
करुन कर्म नाव कोर गगनावरी

– इंजि. नागनाथ कलवले, लातूर

## प्रभात किरणे

शब्द असतात कठोर आणि प्रमेळ
शब्द असतात अमृत आणि विष
शब्द फुलवतात सुखदु:खाची फुले
शब्दच घडवतात एकमेकचे भविष्य

– इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**सरसकट कर्जमाफीवर मंत्रीमंडळाचे शिक्कामोर्तब...**

## चिमटा दयाचा



काही शासकिय कार्यालयात
दिवसाही लाईट चालू असते!
संगणकावर काम नसले
तरी चालू असते!!
वीज बचतीचा संदेश
जनसामान्यासाठी असतो, हाच
संदेश यावेळी दिसून येतो !!!

